# एकलव्य आर्थिक सहाय्य योजना
## आवेदनपत्र भरतांना पाळावयाच्या सूचना

१. आवेदनपत्रातील पृष्ठ क्र. १ वरील विद्यार्थ्यांच्या पासपोर्ट आकाराच्या फोटोग्राफवर संबंधित प्राचार्य/विद्यापीठ विभाग प्रमुख यांची सही व शिक्का आवश्यक.

२. पृष्ठ क्र. १ वरील रकाना ३ मध्ये विद्यार्थ्याचे पालक म्हणून वडिलांचे ऐवजी आईचे नांव असल्यास व वडिल हयात नसल्यास, त्यासंबंधी सक्षम अधिकाऱ्याने दिलेला मृत्यू दाखला जोडणे आवश्यक, तसेच आई, वडिल विभक्त असल्यास घटस्फोट घेतल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्यासमोर केलेले प्रतिज्ञापत्र आवश्यक.

३. पृष्ठ क्र. १ वरील रकाना ३ मध्ये विद्यार्थ्याचे आडनांव व वडिलांचे/आईचे आडनांव यात काही तफावत आढळून आलेले आहे. काही विद्यार्थी वडिलांचे मूळ आडनांव ऐवजी आडनांव म्हणून जात लावतात अशा आडनांवाच्या तफावतीतबाबत संबंधित विद्यार्थ्यांच्या वडिलांनी सक्षम महसूल अधिकारी अथवा प्रथम वर्ग दंडाधिकारी यांचेसमोर केलेले प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे.

४. पृष्ठ क्र.१ वरील रकाना ३(ब) मध्ये वडिलांचा/आईचा व्यवसाय स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक.

५. पृष्ठ क्र.१ वरील रकाना ३(क) व ३(ड) मध्ये नमूद केल्याप्रमाणे वडिल/आई भारताचे नागरिक असल्याबाबतचे राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र व राज्याचे रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.

६. पृष्ठ क्र.२ वरील रकाने अस्पष्ट, संदिग्ध व चुकीचे भरलेले असतात, ते अचूक व स्पष्ट व पूर्ण भरणे आवश्यक.

७. पृष्ठ क्र.३ वरील संबंधित विद्यार्थ्यांच्या आई/वडिलांनी/पालकांनी सादर करावयाच्या उत्पन्नविषयक प्रतिज्ञापत्र सर्व रकाने स्पष्ट व अचूक भरणे आवश्यक.

८. पृष्ठ क्र.३ व ४ वरील उत्पन्नाच्या बाबींशी निगडीत असलेले रकाने ३(अ), १(ब), (ब)२, (ब) ३ व (ब)३, २ मधील संपूर्ण माहिती स्पष्ट व अचूक भरणे आवश्यक.

९. पृष्ठ क्र.३ व ४ वरील आई/वडिलांनी केलेल्या निवेदनावर प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी/नोटरी पब्लिक अथवा सक्षम महसूल अधिकारी यांची सही, शिक्का आवश्यक (निवेदनावर विशेष कार्यकारी अधिकारी/गटविकास अधिकारी/पंचायत समिती सभापती/तलाठी/सरपंच/प्राचार्य व राजपत्रित अधिकारी व मान्यवर व्यक्ती यांची सही, शिक्का ग्राह्य धरता येत नाही.)

१०. पृष्ठ क्र.५ वरील भागीदारी व्यवसाय, आई/वडिल यांचा व्यवसाय, दुकान, टपरी, किराणा सामानाचे दुकान, इलेक्ट्रीक साहित्याचे दुकान, इलेक्ट्रॉनिक दुरुस्ती व्यवसाय, जनरल स्टोअर्स इ. व्यवसायापासून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या प्रमाणपत्रावर सक्षम आयकर अधिकारी यांची सही व शिक्का आवश्यक.

११. शेती व्यवसाय करणाऱ्या पालकांचे पृष्ठ क्र.५ वरील उत्पन्नाबाबतचे प्रमाणपत्रातील शेतजमीन बाबतची माहिती पूर्ण व अचूक भरणे आवश्यक व संबंधित तहशीलदार अधिकारी यांची प्रमाणपत्रावर सही व शिक्का आवश्यक./नायब तहसिलदार यांची प्रमाणपत्रावर सही व शिक्का ग्राह्य धरला जाणार नाही.

१२. वरील रकाना १० व ११ मध्ये नमूद केलेल्या व्यवसायाखेरीज इतर उत्पन्नाच्या बाबींसंबंधी (उदा. मजूरी, खाजगी नोकरी, सरकारी नोकरी, सेवानिवृत्त धारक इ.) मागील वर्षाचे उत्पन्नाबाबतचे सक्षम तहशीलदार अधिकारी यांचे प्रमाणपत्र आवश्क, तसेच पालक जेथे खाजगी/सरकारी नोकरीत असेल तेथील मालकाचेही उत्पन्नाबाबतचे प्रमाणपत्र.

१३. आई/वडिल सेवानिवृत्त असल्यास, सेवानिवृत्ती वेतन ज्या बँकेतून/कोषागारातून घेतले जाते, तेथील सक्षम अधिकाऱ्याचे उत्पन्नाबाबचे प्रमाणपत्र आवश्यक. (तसेच आई/वडिल यांनी सेवानिवृत्तीनंतर मिळालेली रक्कम बँकेत ठेव योजनेत गुंतविलेली असल्यास, त्यावरील मिळालेले व्याजाचे उत्पन्न + सेवानिवृत्ती वेतन यांचा उत्पन्नाच्या दाखल्यात समावेश करावा.)

टीप - आवेदन पत्रातील पृष्ठ क्र.१ वरील रकाना ३ ब मध्ये आई/वडील सेवानिवृत्त झाल्याचे वर्ष व दिनांक नमूद करावा.

१४. पृष्ठ क्र.६ वरील रुजू अहवाल अचूक व पूर्ण भरून संबंधित विद्यापीठ विषय विभाग प्रमुख/महाविद्यालयाचे प्राचार्य यांची सही व शिक्का आवश्यक.

१५. पृष्ठ क्र. ६ वरील महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असल्याबाबतचे प्रमाणपत्र अचूक व पूर्ण भरुन (प्रमाणपत्रामध्ये राज्यातील वास्तव्याचा कालावधी नमूद करणे आवश्यक) सक्षम जिल्हाधिकारी/तहशिलदार यांची प्रमाणपत्रावर सही व शिक्का आवश्यक.

१६. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यामध्ये खंड पडलेला असल्यास, त्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्यासमोर केलेले प्रतिज्ञापत्र व विद्यापीठाचे/महाविद्यालयाचे प्रमाणपत्र आवश्यक.

१७. आवेदनपत्रासोबत पदवी अभ्यासक्रमाच्या साक्षांकित केलेल्या गुणपत्रिकांच्या प्रती जोडणे आवश्यक.

१८. ज्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षी एकलव्य आर्थिक सहाय्य मंजुर झालेले नाही, अशा विद्यार्थ्यांच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या आवेदन पत्रांचा विचार केला जाणार नाही.

१९. आर्थिक सहाय्याचा प्रस्ताव संस्थेच्या रितसर मुखपत्रासह पाठवावा.

महाराष्ट्र शासन

## आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षणासाठी

# "एकलव्य आर्थिक सहाय्य" योजना

(शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मुंबई
क्र. एससीएच. १०९५/(८१)/मशि-४,
दिनांक ७ फेब्रुवारी १९९६ अन्वये)

## एकलव्य आर्थिक सहाय्य योजनेच्या लाभासाठी संभाव्य लाभार्थींनी करावयाच्या अर्जाचा नमुना

उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग

# आवेदनपत्र भरणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

(१) अर्जातील सर्व रकाने संपूर्णपणे व बिनचूक भरावेत. कोणताही रकाना रिक्त ठेवू नये. लागू नसलेला रकाना खोडावा.

(२) अपूर्ण असलेल्या व बिनचुकपणे न भरलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

(३) संपूर्णपणे बिनचूक असलेले अर्ज रुजू अहवालासह संबंधित प्राचार्यांमार्फत/विद्यापीठामार्फत सादर करण्यात यावेत.

(४) संबंधित विद्यार्थ्यास सदर योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आल्यास, त्यांना राज्य शासनाची अथवा केंद्र शासनाची दुसरी कोणतीही शिष्यवृत्ती स्वीकारता येणार नाही.

(५) सदर आर्थिक सहाय्य ज्या अभ्यासक्रमासाठी मंजूर करण्यात येईल, तो अभ्यासक्रम विद्यार्थ्याने बदल्यास अथवा मध्येच सोडून दिल्यास, सदर आर्थिक सहाय्य रद्द करण्यात येईल.

(६) जर संबंधित विद्यार्थी पदव्युत्तर अभ्यासक्रमात प्रवेश घेतल्यानंतर कालांतराने गंभीरपणे आजारी पडल्यास व गंभीर आजाराच्या कारणास्तव वार्षिक परीक्षेस बसू शकला नाही, तरी संबंधित विद्यार्थ्याने त्याच्या आजारपणाबाबतचे सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याचे (जिल्हा चिकित्सक वैद्यकीय अधिकारी) वैद्यकीय प्रमाणपत्र त्वरित संबंधित प्राचार्यांच्या/विद्यापीठामार्फत अभिप्रायासह या संचालनालयास सादर करावे. अशा बाबतीत संबंधित विद्यार्थ्याचे आर्थिक सहाय्य आजारपणाच्या कालावधीपुरते स्थगित ठेवण्यात येईल. जर संबंधित विद्यार्थी कालांतराने त्याच वर्षी परीक्षेस बसल्यास त्याला संबंधित वर्षातील उर्वरित कालावधीचे आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात येऊ शकते.

(७) विद्यार्थी अर्धवेळ किंवा पूर्णवेळ नोकरी करीत असल्यास अशा विद्यार्थ्यास सदर योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य अनुज्ञेय होणार नाही.

(८) संबंधित विद्यार्थ्याची वर्गातील किमान ७५% उपस्थिती असणे आवश्यक आहे. तसेच समाधानकारक प्रगती व चांगली वर्तणूक असली पाहिजे व तसे संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे.

(९) संबंधित विद्यार्थ्यास सदर आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आल्यानंतर सदर आर्थिक सहाय्य न स्वीकारता त्या विद्यार्थ्याने आपला अभ्यासक्रम अर्धवट/ मध्येच सोडून दिल्यास, त्या विद्यार्थ्याचे संबंधित वर्षाचे आर्थिक सहाय्य रद्द करण्यात येईल, तथापि त्या विद्यार्थ्याने पुढील वर्षी अन्य/दुसऱ्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यास त्याला संबंधित वर्षाचे आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात येईल. अशा बाबतीत आर्थिक सहाय्याचे नूतनीकरण अनुज्ञेय ठरणार नाही.

(१०) मंजूर केलेल्या आर्थिक सहाय्याची जी रक्कम संबंधित विद्यार्थ्यास अदा करण्यात आलेली नसेल त्या रकमेचा नियमानुसार चलनाने शासकीय कोषागारात भरणा करून, चलनाची मूळप्रत या संचालनालयात अविलंब पाठविण्यात यावी, व याबाबतचा सविस्तर अहवाल अविलंब सादर करण्यात यावा.

(११) सदर आर्थिक सहाय्य एकाच पदव्युत्तर अभ्यासक्रमास अनुज्ञेय राहील. तथापि असा पदव्युत्तर अभ्यासक्रम संबंधित विद्यापीठाने मान्य केलेला असला पाहिजे.

(१२). सदर आर्थिक सहाय्य ज्या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी मंजूर करण्यात येईल त्या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अन्य अभ्यासक्रमास, ते देय ठरणार नाही.

(१३) अर्ज विहित नमुन्यातच सादर करावेत. नुतनीकरणाचे अर्ज सादर करताना उपस्थिती समाधानकारक आहे असा मोघम उल्लेख न करता उपस्थितीची तसेच गुणांचीही टक्केवारी स्पष्टपणे नमुद करावी.

(१४) सदर विद्यार्थ्यास एकलव्य योजनेच्या अंतर्गत आर्थिक सहाय्य मंजूर झाल्यास त्याला केंद्र/राज्य शासनाची शिष्यवृत्ती स्वीकारता येणार नाही.

# एकलव्य शैक्षणिक आर्थिक सहाय्य शिष्यवृत्ती

(शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग,
मुंबई क्र. एस्सीएच्./१०९५/(८१)/मशि-४,
दिनांक ७ फेब्रुवारी १९९६)

संबंधित विद्यार्थ्याचा पासपोर्ट आकाराचा "फोटोग्राफ" येथे चिकटविणे

टीप .– विद्यार्थ्यांना "फोटोग्राफ" संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून अथवा संबंधित विद्यापीठाच्या कुलसचिवांकडून स्वाक्षांकित करून घेणे अनिवार्य आहे.

**सदर आर्थिक सहाय्य योजनेच्या लाभासाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याबाबतचा तपशील**

(१) विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव (ठळक अक्षरांत व देवनागरी लिपीत) (आडनाव प्रारंभी लिहावे) . .

(२) विद्यार्थ्याचा संपूर्ण पत्ता :–

(अ) घरचा व कायमस्वरूपी पत्ता . .

(ब) पत्रव्यवहाराचा पत्ता . .

(३) वडिलांचे/पालकाचे संपूर्ण नाव . .

(अ) वडिलांचा/पालकाचा घरचा कायमस्वरूपी पत्ता . .

(ब) वडिलांचा/पालकाचा व्यवसाय (व्यवसाय स्पष्टपणे व न चुकता नमूद करण्यात यावा) . .

(क) वडील/पालक भारताचे नागरिक आहेत काय? (राष्ट्रीयत्त्वाबाबतचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडावे) . .

(ड) वडील/पालक महाराष्ट्र राज्यात किती वर्षांपासून वास्तव्य करीत आहेत. . .

(टीप .– याबाबत संबंधित तहसिलदाराचे त्यांच्या स्वाक्षरी व शिक्क्यानिशी महाराष्ट्र राज्याचे रहिवासी किती वर्षांपासून आहेत याचे प्रमाणपत्र जोडावे.)

(४) (अ) विद्यार्थ्याची जन्मतारीख : (जन्मतारीख इसवी सनात नमूद करावी.)

(अंकी) . .

(अक्षरी) . .

(ब) जन्माचे ठिकाण :–

गाव, तालुका, जिल्हा व राज्य . .

(५) <u>शैक्षणिक अर्हतेबाबतचा तपशील :–</u>

(अ) ज्या विभागीय शालांत/उच्च माध्यमिक परीक्षा मंडळांतर्गत विद्यार्थ्याने इयत्ता १० वीची परीक्षा उत्तीर्ण केली, त्या विभागीय मंडळाचे नाव व वर्ष. . .

(ब) इ. १२ वी परीक्षा ज्या विभागीय शालांत/उच्च माध्यमिक मंडळामार्फत उत्तीर्ण केली त्या विभागीय मंडळाचे नाव व वर्ष. . .

(क) ज्या महाविद्यालयामधून व विद्यापीठामधून विद्यार्थ्याने प्रथम पदवी परीक्षा उत्तीर्ण केली त्या महाविद्यालयाचे व विद्यापीठाचे नाव. . .

(ड) ज्या विषयात प्रथम पदवी परीक्षा उत्तीर्ण केली त्या पदवीचे व विद्याशाखेचे (Faculty) नाव. . .

(इ) प्रथम पदवी उत्तीर्ण झाल्याचे वर्ष . .

(ई) प्रथम पदवी परीक्षेत प्राप्त झालेले एकूण गुण व मिळालेली श्रेणी (गुणांच्या टक्केवारीसह). . .

(**टीप** .– प्रथम पदवी परीक्षा उत्तीर्ण केल्याचे तात्पुरते पदवी प्रमाणपत्र (Degree Certificate) व त्यासोबत प्रथम पदवी परीक्षेच्या स्वाक्षांकित गुणपत्रिका जोडणे अनिवार्य आहे).

(६) <u>उत्पन्नाबाबतचा तपशील</u> :—

(अ) विद्यार्थ्याच्या आई-वडिलांचे/पालकाचे मागील वर्षाचे ३१ मार्च अखेर सर्व साधनांपासून मिळालेले एकूण वार्षिक उत्पन्न. . .

(**टीप** .– पृष्ट क्र. ३ ते ५ वरील उत्पन्नविषयक प्रतिज्ञा-पत्राच्या नमुन्यामध्ये उत्पन्नाबाबतची आवश्यक ती सर्व माहिती नमूद करून, सदर उत्पन्नविषयक प्रतिज्ञा-पत्रक प्रथमश्रेणी न्याय दंडाधिकारी/सक्षम महसूल विभाग अधिकारी/नोटरी पब्लिक यांचे समक्ष प्रमाणित केलेले असावे).

(ब) विद्यार्थी अंशकालीन/पूर्ण कालीन नोकरी करीत आहे काय ? असल्यास, मिळणारे वेतन. . .

(क) विद्यार्थ्यास विद्यावेतन/राज्य/केंद्र शासनाची अथवा इतर शिष्यवृत्ती मिळते काय ? असल्यास, तपशील नमूद करण्यात यावा. . .

प्रमाणित करण्यात येते की, सदर अर्जात केलेले निवेदन खरे आहे. मी असेही जाहीर करतो की, मला सदर योजनेखाली, ज्या अभ्यासक्रमासाठी आर्थिक सहाय्य मंजूर झालेले आहे, तोच अभ्यासक्रम पूर्ण करीन आणि मी अन्य कोणतीही शिष्यवृत्ती स्वीकारणार नाही.

ठिकाण :

दिनांक :

विद्यार्थ्याची स्वाक्षरी.

# संबंधित विद्यार्थ्याच्या आई-वडिलांनी/पालकानी सादर करावयाचे उत्पन्नविषयक प्रतिज्ञापत्र

मी, श्री./श्रीमती ..........................................................................................

राहणार .......................... तालुका ........................................ जिल्हा .................................... जाहीर करतो की,

(१) माझा मुलगा/मुलगी/पाल्य कुमार/कुमारी ..........................................................................

हा/ही ........................................................................................................ या महाविद्यालयात/

विद्यापीठांतील पदव्युत्तर विभागात ............................................................................... या पदवीचे

.................................................... या शैक्षणिक वर्षात ............................................................ या

विद्याशाखा अंतर्गत शिक्षण घेत आहे.

(२) मी असे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो की, सन .............. या मागील आर्थिक वर्षातील खालील परिच्छेद ............ मध्ये नमूद

केल्यानुसार सर्व मार्गांनी/साधनांपासून मिळालेले एकूण वार्षिक उत्पन्न रु. ..........................................................

(रुपये ............................................................................................... ) इतके आहे.

वर नमूद केलेले उत्पन्नाबाबतचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र यासोबत जोडलेले आहे.

(३) शेतजमिनीपासून मिळणारे उत्पन्न :

(अ) आई/वडील/पालक यांनी धारण केलेली शेतजमीन :—

(१) शेतजमिनीचे एकूण क्षेत्र (हेक्टरमध्ये) ..

(२) महसुली गावाचे नाव ..

(३) सर्व्हे नंबर ..

(४) आकारणी करण्यात आलेल्या शेतसाऱ्याची रक्कम ..

(५) एकूण वार्षिक उत्पन्न ..

(ब) (१) धारण केलेली स्थावर/जंगम मालमत्ता व त्यापासून मिळालेले वार्षिक उत्पन्न (घर, दुकान इ.) :—

(अ) घर क्रमांक ..

(ब) रस्ता/गल्ली ..

(क) गाव/शहर ..

(ड) एकूण क्षेत्रफळ ..

(इ) मिळालेले घरभाडे .. रु.

(ई) घरपट्टी .. रु.

(उ) स्वच्छता कर .. रु.

(ऊ) कर वजा जाता मिळालेले घरभाड्यापोटी निव्वळ वार्षिक उत्पन्न. .. रु.

(ब) (२) <u>दुकानापासून मिळालेले वार्षिक उत्पन्न :—</u>

(अ) दुकानाचा पत्ता ..

(ब) दुकानदारीच्या व्यवसायाचे स्वरूप ..

(क) भरलेला विक्रीकर .. रु.

(ड) भरलेला आयकर .. रु.

(इ) दुकानाचा परवाना क्रमांक ..

(ई) वरील कर वजा जाता मिळालेले निव्वळ वार्षिक उत्पन्न रु.

(ब) (३) (१) <u>वेतनधारकांच्या उत्पन्नाबाबतचा तपशील :—</u>

(अ) वडिलांचे/पालकाचे वेतन ..

(ब) मालकाचे/नोकरीस ठेवणाऱ्याचे नाव ..

(क) नोकरीचे स्वरूप/नोकरीचा हुद्दा ..

(ड) नोकरीचे ठिकाण/कार्यालयाचा संपूर्ण पत्ता ..

(इ) घरभाडे वजा जाता वेतनापासून मिळालेले एकूण वार्षिक उत्पन्न (भरलेला आयकर धरून). ..

(ब) (३) (२) <u>आईचे वेतन :—</u>

(अ) मालकाचे/नोकरीस ठेवणाराचे नाव ..

(ब) नोकरीचे स्वरूप/नोकरीचा हुद्दा ..

(क) नोकरीचे ठिकाण/कार्यालयाचा संपूर्ण पत्ता ..

(ड) घरभाडे वजा जाता वेतनापासून मिळालेले एकूण वार्षिक उत्पन्न (भरलेला आयकर धरून). ..

मी, वरीलप्रमाणे केलेले उत्पन्नविषयक निवेदन संपूर्णपणे खरे असून, जर सदर निवेदनातील कोणतीही माहिती अंशतः अथवा पूर्णतः चुकीची/असत्य/विपर्यस्त असल्याचे सिद्ध झाल्यास, त्याबाबत सर्वस्वी मी व्यक्तिशः जबाबदार राहीन व माझ्या मुलास/मुलीस/पाल्यास सदर योजनेअंतर्गत मंजूर व प्राप्त झालेल्या आर्थिक सहाय्याच्या रकमेच्या दुप्पट रक्कम दंडादाखल शासनास परत करण्याची हमी देत आहे. याबाबतचा शासनाचा कोणताही निर्णय माझ्यावर अंतिमतः बंधनकारक राहील.

ठिकाण :

दिनांक :

आई/वडील/पालक यांची स्वाक्षरी.

---

वरील स्वाक्षरी करणाराचे संपूर्ण नाव ..........................................

मी .......................................................... असे प्रामाणित करतो की,

श्री./श्रीमती .......................................................... यांनी माझ्या समक्ष आज

दिनांक .................................... रोजी वरील स्वाक्षरी केलेली आहे.

<u>स्वाक्षरी व पदनामाचा शिक्का</u>

नोटरी पब्लिक/प्रथमश्रेणी न्याय दंडाधिकारी/सक्षम महसूल अधिकारी.

**टीप :—** (१) मागील आर्थिक वर्षाच्या १ एप्रिल ते ३१ मार्च या आर्थिक वर्षातील उत्पन्न नमूद करण्यात यावे.

(२) याबाबतचे स्वतंत्र परिशिष्ट पृष्ठ क्रमांक ५ वर पहावे.

(३) विद्यार्थ्याच्या कुटुंबाचे संबंधित वर्षाचे एकूण वार्षिक उत्पन्न दर्शविताना फक्त वडील/पालक व आई यांचे उत्पन्न एकत्रितपणे विचारात घेण्यात यावे. (कुटुंबातील अन्य व्यक्तींचे उत्पन्न विचारात घेऊ नये.)

(४) जर विद्यार्थ्याचे वडील हयात नसतील तर संबंधित विद्यार्थ्याच्या आईचे उत्पन्न विचारात घेण्यात यावे.

(५) विद्यार्थ्याचे आई आणि वडील दोन्हीही हयात नसल्यास विद्यार्थ्याच्या पालकाचे व विद्यार्थ्याचे उत्पन्न (असल्यास) असे दोघांचेही उत्पन्न विचारात घेण्यात यावे.

## व्यवसाय व भागीदारीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री. / श्रीमती ……
राहणार ……
हे …… हा व्यवसाय …… या गावात
…… तालुका …… जिल्हा …… राज्य,
या ठिकाणी करीत असून त्यांचे …… या वर्षाचे एकूण वार्षिक उत्पन्न
रु. …… इतके आहे.

(२) प्रमाणित करण्यात येते की, वर दर्शविलेले …… या आर्थिक वर्षाचे एकूण वार्षिक उत्पन्नात श्री. …… यांच्या कुटुंबास सर्व मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नाचा अंतर्भाव आहे.

(३) तसेच पुढे असेही प्रमाणित करण्यात येते की, वरील उत्पन्नाची माहिती …… या वर्षाच्या आयकर विवरणपत्र व आयकर निर्धारण अहवालानुसार देण्यात आलेली आहे.

ठिकाण :

दिनांक :

सक्षम आयकर अधिकारी यांची
सही व शिक्का.

---

(टीप : वार्षिक उत्पन्नात मागील वर्षातील १ एप्रिल ते ३१ मार्च ह्या कालावधीचे उत्पन्न दाखविण्यात यावे.)

## शेतजमिनीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, खालील शेतजमीन धारण करणारे श्री./श्रीमती ……
राहणार …… यांचे
…… या वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु. …… इतके आहे.

(१) सर्व्हे नंवर : :
(२) क्षेत्र आकार : :
(३) गाव : :
(४) शेतसारा रक्कम : :
(५) वार्षिक उत्पन्न : :

प्रमाणित करण्यात येते की, वरील वार्षिक उत्पन्नाची माहिती संबंधित सर्व उपलब्ध कागदपत्रांची तपासणी करून देण्यात आलेली आहे.

ठिकाण :

दिनांक :

जिल्हाधिकारी/तहसीलदार
यांची सही व शिक्का.

## रुजू अहवाल

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती/कुमारी ..............................................................

यांना या महाविद्यालयात ................................................ या शैक्षणिक वर्षासाठी ................................ या वग

दिनांक ............................................ रोजी नियमित विद्यार्थी म्हणून रीतसर प्रवेश देण्यात आलेला आहे.

प्राचार्य/विद्यापीठ विषय विभागप्रमुख.

ठिकाण :

स्वाक्षरी :

दिनांक :

संपूर्ण नाव :

---

## महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असल्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती/कु. ..............................................................

राहणार ........................................ गाव ................................ तालुका ................................

जिल्हा ............................................ हे भारताचे नागरिक असून महाराष्ट्र राज्यामध्ये त्यांचे वास्तव्य ....................

इतक्या वर्षांपासून आहे.

ठिकाण :

दिनांक :

जिल्हाधिकारी/तहसीलदार
यांची सही व शिक्का.

शामुको.–वाय–४८९–२५,०००–८.९९